# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/02/2024 (गुरूवार) दुपार


### पोस्टे मौदा येथील खुनाचे रहस्य उलगडले, पोलीस स्टेशन मौदाची कारवाई

दि. ३०/०१/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा. दरम्यान पोलीस ठाणे मौदा येथील डायल ११२ MDT वर कॉल आला कि, गुमथळा ते पडसाळ रोडवरील नाल्यात एका अनोळखी वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयोगटातील पुरुष जातीचे इसमाचा खून झाला आहे. अशी माहिती मिळताच पोलीस ठाणे मौदा येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग पोटे यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून लगेच पोलीस ठाण्यात उपलब्ध जास्तीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह पळसाळ येथील घटनास्थळ गाठले व नाल्यातील प्रेत बाहेर काढून प्रेताची पाहणी केली असता त्याचे मानेवर व पाठीवर चाकुसारखे धारदार शस्त्राचे घाव दिसले. व मृतकाचे खिशात चावीचा गुच्छा मिळून आला व त्यात एक EICHER गाडीची चावी दिसून आली. करीता सदर घटनेची पोलीस निरीक्षक पराग पोटे यांनी तात्काळ वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देवून मृतक हा अनोळखी असल्याने त्याची ओळख पटविणे करीता व EICHER गाडीचा तसेच आरोपीचा शोध घेणे करीता वेगवेगळया टीम तयार करून रवाना करण्यात आले, तसेच राहुल नानाजी झाडे, रा. पडसाड यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे मौदा येथे अप क्र. ६१/२४ कलम ३०२ भा.द. वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात अनोळखी मृतकाचे फोटो दाखवून मौदा पोलीस माहिती काढीत असता सदरचा इसम हा गुमथळा येथील हल्दीराम कंपनीत ट्रक भरणेकरीता आला असल्याचे पोलिसांना तेथील माल भरणारे इसमांनी सांगितले व मृतकाचे नाव अरविंद वसंतराव पंधरे, वय २९ वर्षे रा. झरकड, ता. राळेगाव, जिल्हा यवतमाळ असल्याचे माहिती काढण्यात मौदा पोलिसांना यश आले. त्यानंतर यातील मृतकाचा खून करणारे आरोपीचा शोध घेण्याचे मौदा पोलिसांपुढे आव्हान होते, पोलिसांनी CCTV फुटेज चेक करून, गुप्त बातमीदार लावून दिवस रात्र अथक प्रयत्न करून गुन्ह्यातील १) नामे प्रफुल उर्फ यश सुधीर पौनिकर वय १८ वर्ष रा. आवंडी ता. कामठी जि. नागपुर २) विशाल उर्फ बच्चा चक्रधर चिचुडे वय ३५ वर्ष रा. आवंडी ता. कामठी जि. नागपुर ३) विजय चिंधुलाल कटरे वय ३५ वर्ष रा. मरार टोला ता. लालबर्रा जि. बालाघाट म. प्र. ह.मु. दयाराम आडकीने सावळी ता. कामठी जि. नागपुर व ४) विधी संघर्षग्रस्त बालक यांनीच खून केल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी लगेच तिघांनाही त्यांचे घरून व विधी संघर्षग्रस्त बालकास धामणगाव रेल्वे येथून ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्यांनी अगोदर उड़वा उडवीचे उत्तरे दिली त्यानंतर त्यांना विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली व सांगितले की, प्रफुल पौनिकर याचा हल्दीराम कंपनीसमोर ढाबा असून मृतक हा त्याचे धाब्यावर आला व जेवण मागित होता परंतु ढाबा बंद असल्याने त्याला जेवण नाही असे म्हटले असता अरविंद पंधरे याने दारुच्या नशेत शिवगाळ करुन जेवन मागित होता व त्याला जेवण दिले नाही तर त्याने त्यांना पाहुन घेण्याची धमकी देत असल्याने वरिल नमुद तिन्ही आरोपी तसेच त्यांचे सोबत असलेला विधी संघर्षग्रस्त बालक यांनी संगणमत करुण मृतक अरविंद पंधरे याला रोड च्या पलीकडे नेवुन त्याचे मानेवर व पाठीवर धारदार चाकूने सपासप वार करून अरविं खून केला व कुणाला संशय येणार नाही म्हणून प्रफुल पौनिकर याने त्याचा ड्रायव्हर विजय कटरे याचे हस्ते त्याचे पिकअप मध्ये रात्री प्रेत टाकून पडसाळ येथील नाल्यात फेकून दिल्याचे त्यांनी सांगितले वरून त्यांना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी, पोलीस ठाणे मौदा करीत आहे.

सदरचा गुन्हा श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण नागपूर श्री. संदीप पखाले, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, श्री. पुंडलिक भटकर उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग, श्री. पराग पोटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे मौदा यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज चौधरी, पोउपनि सचिन उरकुडे, पो. हवा, भास्कर मेटकर, संदीप कडू, प्रकाश गाठे, गणेश मुदमाळी, हरीश येंगलवार, प्रदीप ठाकरे, रुपेश महादुले, पो.ना. तुषार कुडूपले, दिपक दरोडे, अजय वाघमारे, पो. शि. नितीन सार्वे, प्रज्वल नंदेश्वर, अतुल निम्बार्ते, शुभम ईश्वरकर यांनी उघडकीस आणला. गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी, पोलीस ठाणे मौदा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर